-: प्रेसनोट दिनांक- ०७/११/२०२४ :-

**आरोपी लोकसेवक महेश रामचंद्र मासाळ वय ३४ वर्षे,रा.अमेय वैभव रेसिडन्सी बिल्डीग,पोटोळेवाडी,ई वॉर्ड कोल्हापुर मुळ रा.बीएसएनएल गोडाऊन शेजारी,संजयनगर पोलीस ठाणे रोड चैतन्य नगर सांगली ता. मिरज जिल्हा सांगली यांनी लाच मागणी केलेबाबत.....**

---

यातील तकारदार यांचे मालकीचे स्वीट मार्ट चा व्यवसाय आहे. सदर व्यवसाय करीत असताना अन्न औषध प्रशासन कार्यालय, कोल्हापूर येथील अधिकारी हे तकारदार यांचे वरील स्वीट मार्ट मध्ये तपासणी करीता वारंवार येत असतात. दिनांक ०७/०९/२०२३ रोजी अन्न सुरक्षा अधिकारी श्री माशाळ साहेब यांनी तकारदार यांचे स्वीट मार्ट दुकानाची तपासणी करून तकारदार यांचेवरती केस केली होती. सदरची केस ही न्यायनिर्णय अधिकारी अन्न औषध प्रशासन, म.रा.पुणे यांचे समोर चालु आहे. सदर केसचे अनुषंगाने तकारदार यांना दिनांक २२/११/२०२३ रोजी हजर राहणेबाबत नोटीस आली होती परंतु सदरची नोटीस तकारदार यांना दिनांक २८/११/२०२३ रोजी मिळालेने ते हजर राहीले नाहीत. त्यानंतर माशाळ साहेब तकारदार यांना भेटले त्यावेळी त्यांनी तकारदार यांचे स्विट मार्ट वरती केलेली केस तडजोड करून मिटवतो असे सांगुन त्यासाठी त्यांनी तकारदार यांचेकडे ३०,०००/- रूपयांची मागणी केली. त्यावेळी तकारदार यांनी त्यांना यातील रक्कम कमी करा अशी विनंती असता त्यांनी माशाळ यांनी ठिक आहे असे म्हणुन २०,०००/- रूपये दिले तरच मग केस मिटवुन देतो असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यानंतर तकारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तकार दिलेली होती.

तकारदार यांचे तकारीप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आरोपी लोकसेवक श्री.महेश माशाळ अन्न निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन विभाग कोल्हापूर जि.कोल्हापूर यांनी तकारदार यांचे में. रामचंद्र बाबाजी माळकर स्वीट मार्ट वरती अन्न औषध प्रशासन कार्यालयाकडुन केले कारवाईबाबत आले नोटीसबाबत पुणे येथील जॉईंट कमिशनर यांना भेटुन तकारदार यांचे केसचे दंडासाठी व उर्वरीत राहीलेले पैसे साहेबांना दयावे लागतील असे म्हणुन तकारदार यांचेकडे तीस हजार रूपये तयार ठेवा असे सांगुन माशाळ यांनी त्यांचे वरीष्ठांकरीता तकारदार यांचेकडे त्यांना आले नोटीसवरती काही पैसे दंड व उर्वरीत पैसे त्यांचे पुणे येथील साहेबांना दयावे लागतील असे म्हणुन तकारदार यांचेकडे तीस हजार रूपये लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले.

सदरबाबत तकारदार यांनी आरोपी लोकसेवक महेश माशाळ यांनी तकारदार यांचे स्वीट मार्ट वरती अन्न औषध प्रशासन कार्यालयाकडुन केले कारवाईबाबत आले नोटीसबाबत पुणे येथील जॉईंट कमिशनर यांना भेटुन त्यांचेवर झाले केसचे दंडासाठी व उर्वरीत राहीलेले पैसे साहेबांना दयावे लागतील असे म्हणुन तकारदार यांना तीस हजार रूपये तयार ठेवा असे सांगुन माशाळ यांनी त्यांचे वरीष्ठांकरीता तकारदार यांना आले नोटीसवरती काही पैसे दंड व उर्वरीत पैसे त्यांचे पुणे येथील साहेबांना दयावे लागतील असे म्हणुन तकारदार यांचेकडे तीस हजार रूपये लाचेची मागणी मागणी केली आहे म्हणुन त्याचेविरूध्द जुना राजवाडा पोलीस ठाणे कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार वैष्णवी सुरेश पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.कोल्हापूर, पो.हे.कॉ विकास माने, पो.ना.सुधिर पाटील, पो.कॉ. संदिप पवार अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१
२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :-
०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३) वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७.
४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.
५) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४
६) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.